वित्तीय मान्यता

**गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना २०१७-१८**

**महाराष्ट्र शासन**

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः शेअवि-२०१७/प्र.क्र.१८१/११-अे**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
तारीख: ०५ डिसेंबर, २०१७

वाचा -

१) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. एनएआयएस १२०४/प्र.क्र.१६६/११-अे, दि. १९.८.२००४
२) शासन निर्णय,कृषि व पदुम विभाग क्र. एनएआयएस १२०४/प्र.क्र.१६६/११-अे, दि. ५.१.२००५
३) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. शेअवि-२००७/प्र.क्र.२३२/११-अे, दि. १३.७.२००७
४) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. शेअवि-२००९/प्र.क्र.२६८/११-अे, दि. ४.१२.२००९
५) शासन शुद्धीपत्र, कृषि व पदुम विभाग क्र. शेअवि-२००९/प्र.क्र.२६८/११-अे, दि. ५.३.२०११
६) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. शेअवि-२०१४/प्र.क्र.६९/११-अे, दि. ३०.१०.२०१४
७) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. शेअवि-२०१४/प्र.क्र.६९/११-अे, दि. ३१.१०.२०१५
८) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. शेअवि-२०१५/प्र.क्र.१५९/११-अे, दि.२६.११.२०१५
९) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. शेअवि-२०१६/प्र.क्र.१८४/११-अे दि.२५.११.२०१६
१०) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. शेअवि-२०१६/प्र.क्र.१८४/११-अे दि.२५.११.२०१६
११) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. पुनर्वि-२०१७/प्र.क्र.१४९/१७/२-अे, दि. ०५.१२.२०१७
१२) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग क्र. शेअवि-२०१७/प्र.क्र.१८१/११-अे दि. ०५.१२.२०१७

प्रस्तावना -

शेती व्यवसाय करताना होणारे अपघात, वीज पडणे, पूर, सर्पदंश, विंचूदंश, विजेचा शॉक बसणे इ. नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे अपघात, रस्त्यावरील अपघात, वाहन अपघात, तसेच, अन्य कोणत्याही कारणांमुळे होणारे अपघात, यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांचा मृत्यू ओढवतो किंवा काहींना अपंगत्व येते. घरातील कर्त्या व्यक्तिस झालेल्या अपघातामुळे कुटुंबाचे उत्पन्नाचे साधन बंद होवून अडचणीची परिस्थिती निर्माण होते. अशा अपघातग्रस्त शेतकऱ्यांस/त्यांच्या कुटुंबास आर्थिक लाभ देण्याकरिता कोणतीही स्वतंत्र विमा योजना नसल्यामुळे शासनाने राज्यात “शेतकरी व्यक्तीगत अपघात विमा योजना” ही योजना सन २००५-०६ पासून कार्यान्वित केलेली आहे. सन २००९-१० पासून सदर योजनेचे नामाभिधान “शेतकरी जनता अपघात विमा योजना” असे करण्यात आलेले आहे. आता २०१५-१६ पासून सदर योजना “**गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना**” या नावाने रु.२.०० लाख इतक्या विमा संरक्षणासह राबविण्यात येत आहे. सदर योजना सन २०१७-१८ या वर्षात राबविण्यासाठी दि.०५.१२.२०१७ च्या शासन निर्णयान्वये शासनाची मान्यता देण्यात आली आहे. ही योजना राबविण्यासाठी विमा कंपनी, तसेच विमा सल्लागार कंपनी यांची नियुक्ती करणे तसेच विमा हप्ता व विमा ब्रोकरेज निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय -**

उपरोक्त दि. १३ जुलै, २००७ च्या शासन निर्णयान्वये प्रधान सचिव (कृषि) यांच्या अध्यक्षतेखाली विमा हप्ता दर निश्चित करणे व विमा कंपन्यांची नियुक्ती करण्यासाठी समिती गठीत करण्यात आलेली आहे. सन २०१७-१८ मध्ये विमा योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता विमा सल्लागार कंपनी, तसेच, विमा कंपन्यांची नियुक्ती करणे व विमा हप्ता दर ठरविणे याकरिता आयुक्त (कृषि) यांनी मागविलेल्या ई-निविदाच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन आयुक्त (कृषि) यांनी त्यांचा प्रस्ताव शासनाला सादर केला होता .कृषि आयुक्तालयाच्या प्रस्तावासंदर्भात प्रधान सचिव (कृषि) यांच्या अध्यक्षतेखाली उपरोक्त समितीची दि.२८.११.२०१७ रोजी बैठक झाली असून समितीने सन २०१७-१८ या वर्षाकरिता दि.ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि, या विमा कंपनीने न्यूनतम निविदा दर दिला असल्याने सदर दरास मान्यता देण्याची शिफारस केली आहे. समितीची शिफारस लक्षात घेवून विमा कंपनीने खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार विमा संरक्षणासाठी दिलेला प्रति शेतकरी प्रति वर्ष रु. ३१.७५ इतका विमा हप्ता दर (विना ब्रोकरेज) मान्य करुन सदर कंपनीची सन २०१७-१८ या वर्षाकरिता, संपूर्ण राज्यासाठी, विमा कंपनी म्हणून नियुक्ती करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

| अ.क्र. | अपघाताची बाब | नुकसान भरपाई |
|---|---|---|
| १ | अपघाती मृत्यू | रु.२,००,०००/- |
| २ | अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन अवयव निकामी होणे | रु.२,००,०००/- |
| ३ | अपघातामुळे एक डोळा व एक अवयव निकामी होणे | रु.२,००,०००/- |
| ४ | अपघातामुळे एक डोळा अथवा एक अवयव निकामी होणे | रु.१,००,०००/- |

२. वरील पार्श्वभूमिवर सन २०१७-१८ मध्ये विमा हप्ता रकमेचे विमा कंपनीला प्रदान झाल्यापासून १२ महिने इतक्या कालावधीकरिता राज्यातील सर्व नोंदणीकृत शेतकऱ्यांना प्रस्तावनेमध्ये नमूद बाबींच्या अपघातांपासून संरक्षण देण्यासाठी विमा कंपनीला अदा करावयाची विमा हप्ता रक्कम खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | विमा कंपनीचे नाव | शेतकरी संख्या | विना ब्रोकरेज विमा हप्ता रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | दि.ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि. | **१,३६,९८,९६५** | **४३४९४२१३९ /-** |

३. प्रस्तुत शासन निर्णयाव्दारे नियुक्त करण्यात येत असलेल्या विमा कंपनीस, वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे १२ महिने कालावधीकरिता होणारी एकूण विमा हप्ता रक्कम रु. ४३४९४२१३९ /- (रू. त्रेचाळीस कोटी एकोणपन्नास लाख बेचाळीस हजार एकशे एकोणचाळीस फक्त) मंजूर करुन वितरित करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

४. विमा प्रस्ताव विहित कागदपत्रांसह ज्या दिनांकास तालुका कृषि अधिकारी यांचे कार्यालयात दाखल / प्राप्त होईल त्या दिनांकासच तो विमा कंपनीस प्राप्त झालेला आहे असे समजण्यात येईल.

५. विमा प्रस्ताव विहित कागदपत्रांसह योजनेच्या कालावधीत कधीही प्राप्त झाला तरी तो विचारात घेणे, तसेच, योजनेच्या अखेरच्या दिवसात झालेल्या अपघातांसाठी, योजनेचा चालू वर्षाचा मंजूर कालावधी संपल्यानंतर ९० दिवसांपर्यंत, तालुका कृषि अधिकाऱ्यांकडे प्राप्त झालेले प्रस्ताव स्विकारणे विमा कंपनीवर बंधनकारक राहील. शिवाय समर्थनीय कारणांसह ९० दिवसांनंतर प्राप्त होणारे विमा प्रस्ताव सुध्दा स्विकारणे विमा कंपनीवर बंधनकारक राहील. प्रस्ताव विहित मुदतीत सादर केले नाहीत, या कारणास्तव विमा कंपनीला विमा प्रस्ताव नाकारता येणार नाहीत.

६. विमा कंपनीला सुस्पष्ट कारणांशिवाय विमा प्रस्ताव नाकारता येणार नाहीत. विमा कंपनीने नामंजूर केलेल्या विमा दाव्याप्रकरणी सुस्पष्ट कारणमिमांसा संबंधित शेतकऱ्यांना कटाक्षाने मराठी भाषेतच कळविणे व त्याची प्रत नियुक्त करण्यात आलेली विमा सल्लागार कंपनी / आयुक्त (कृषि) / संबंधित विभागीय कृषि सहसंचालक / जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी / तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे पाठविणे अनिवार्य आहे.

७. प्रस्तुत योजनेकरिता विमा सल्लागार कंपनीची नियुक्ती तसेच त्यांना द्यावयाचे ब्रोकरेज यासंबंधीचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहेत. नियुक्त करण्यात येणाऱ्या विमा सल्लागार कंपनीने त्यांच्याकडे प्राप्त होणारे प्रस्ताव व्यवस्थितरीत्या / पूर्णत: तपासावेत व परिपूर्ण प्रस्ताव संबंधित विमा कंपनीकडे मान्यतेसाठी सादर करावेत. विमा सल्लागार कंपनीने विमा कंपनीकडे पाठविलेले प्रस्ताव मंजूर करुन घेण्याची संपूर्ण जबाबदारी विमा सल्लागार कंपनीची राहील. विमा दावा विमा कंपनीकडे सादर झाल्यापासून त्यावर ६० दिवसांच्या आत कार्यवाही करणे विमा कंपनीवर बंधनकारक राहील. मात्र, तरीही विमा कंपनीने प्रस्ताव नाकारल्यास, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झालेल्या प्रकरणी संबंधितांनी विमा सल्लागार कंपनीशी संपर्क साधल्यास, विमा सल्लागार कंपनीने शेतकऱ्यांच्यावतीने इर्डा ग्राहक तक्रार निवारण कक्ष / विमा न्यायाधीश / जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच / राज्य ग्राहक तक्रार निवारण आयोग /न्यायालय येथे दावे दाखल करणे आवश्यक राहील. अशा प्रकरणी येणाऱ्या कोणत्याही खर्चाची प्रतिपूर्ती शासनाकडून अथवा शेतकऱ्यांकडून/ दावेदारांकडून करण्यात येणार नाही.

८. नियुक्त करण्यात येणाऱ्या विमा सल्लागार कंपनीने जिल्ह्यातील प्रलंबित प्रकरणांची यादी व मासिक प्रगती अहवाल आयुक्त (कृषि) / विभागीय कृषि सहसंचालक / संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी / तालुका कृषि अधिकारी यांचेकडे दरमहा पाठवावा. **अपुऱ्या कागदपत्रांमुळे प्रलंबित राहिलेल्या / नाकारलेल्या प्रस्तावांप्रकरणी कागदपत्रांची पूर्तता करण्याची जबाबदारी विभागीय कृषि सहसंचालक / जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी / तालुका कृषि अधिकारी यांची राहील. त्यांनी त्यांची जबाबदारी व्यवस्थितरित्या पार पाडली नाही तर त्यांना वैयक्तिकरित्या जबाबदार धरण्यात येईल.**

९. गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेसंबंधी शासनाचे वतीने आयुक्त कृषि तसेच नियुक्त करण्यात येणारी विमा सल्लागार कंपनी व विमा कंपनी यांचेमध्ये प्रस्तुत शासन निर्णयातील अटी/शर्ती व मान्यतेनुसार सामंजस्य करार (MOU) व त्रिपक्षीय करार (Tripartite Agreement) करुन त्यानुसार योजना अंमलात आणली जाईल. शासन व विमा कंपनीमध्ये झालेल्या पॉलिसी करारातील तरतूदी, उपरोक्त दि.४ डिसेंबर,२००९ च्या शासन निर्णयाद्वारे व उपरोक्त दि.५ मार्च,२०११ च्या शासन निर्णय शुध्दीपत्रान्वये विहित केलेल्या अटी व शर्ती, तसेच, भविष्यात लागू करण्यात येणाऱ्या अटी व शर्ती, तसेच, मार्गदर्शक

सुचनांनुसार विमा दावे मंजूर करणे, तसेच, विमा प्रस्तावांसंदर्भातील कार्यपध्दती, सादर करावयाच्या आवश्यक कागदपत्रांबाबतचा तपशिल व नमुने इ. बाबी विमा कंपनीवर बंधनकारक राहतील.

१०. यावरील खर्च "मागणी क्रमांक डी-३, २४०१-पीक संवर्धन, ११०- पीक विमा, (००) (०६) शेतकऱ्यांसाठी वैयक्तिक अपघात विमा योजना (२४०१ ४४२७), राज्य योजना, ३३- अर्थसहाय्य" या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ करिता मंजूर अर्थसंकल्पीय तरतूदीतून भागविण्यात यावा.

११. प्रस्तुत प्रयोजनासाठी कृषि संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना नियंत्रक अधिकारी, तसेच, सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सदर रक्कम कोषागारातून काढून रेखांकित धनादेश/दर्शनी धनाकर्षाव्दारे विमा कंपनीस अदा करण्यात यावी.

१२. हा शासन निर्णय, नियोजन विभाग व वित्त विभागाने त्यांचे अनौपचारिक संदर्भ क्रमांक अनुक्रमे १८५/१४३१, दि. ०२.१२.२०१७ व २४९/व्यय-१, दि. ०५.१२.२०१७ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

प्रस्तुत शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेताक २०१७१२०५१७२८५९४६०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sharad Balkrishna Pawaskar

Digitally signed by Sharad Balkrishna Pawaskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture and Adf Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f4ebb91d526d59e93b9365fba816854d2dfa38e53ed59ae4b31ba8260ba52882, cn=Sharad Balkrishna Pawaskar
Date: 2017.12.06 15:39:54 +05'30'

**( श.बा.पावसकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव
३) मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
४) सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
५) मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
६) मा.राज्यमंत्री (फलोत्पादन) यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
७) सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/ विशेष कार्य अधिकारी
८) सर्व मा.विधानसभा सदस्य
९) सर्व मा. विधानपरिषद सदस्य
१०) मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव,मंत्रालय,मुंबई ३२
११) प्रधान सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१२) अपर मुख्य सचिव (महसूल ), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२

१३) अप्पर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४) अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१५) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
१६) प्रधान सचिव (अपिल व सुरक्षा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१७) अप्पर मुख्य सचिव (मदत व पुनर्वसन), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (५ प्रती) प्रसिध्दीच्या विनंतीसह
१९) सर्व विभागीय महसूल आयुक्त (कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर)
२०) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२१) सर्व जिल्हाधिकारी
२२) सर्व कृषि संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२३) सर्व विभागीय कृषि सहसंचालक
२४) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
२५) सर्व जिल्हा परिषदांचे, जिल्हा कृषि विकास अधिकारी
२६) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा परिक्षा), मुंबई.
२७) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, ( लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
२८) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा परिक्षा), नागपूर
२९) महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
३०) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
३१) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
३२) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
३३) दि.ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी लि.,मे.फेअर टॉवर, पुणे-मुंबई रोड, वाकडेवाडी, शिवाजीनगर, पुणे ५
३४) ग्रंथालय प्रमुख, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई (१० प्रती)
३५) मुख्य सांख्यिक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-
३६) सहाय्यक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३७) सर्व तहसिलदार
३८) सर्व उप विभागीय कृषि अधिकारी
३९) सर्व तालुका कृषि अधिकारी
४०) सर्व उपसचिव /अवर सचिव / कक्ष अधिकारी, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४१) सर्व मंत्रालयीन विभाग
४२) सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्ष यांची मध्यवर्ती कार्यालये
४३) निवड नस्ती, कार्यासन ११-अे.